खुला मंच

# पर्यावरणहानी : वैध आव्हान व हत्या

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

नैसर्गिक संसाधनांची लूट, भ्रष्टाचार, गरीबी व सामाजिक संघर्ष हे एकमेकांशी संलग्न आहेत. पर्यावरणाच्या हानीने गरीबी व संघर्ष वाढतात हे जगभर दिसते. दक्षिण अमेरिका खंड, आशिया व आफ्रिकेत जास्त.

२०१६ हे वर्ष पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी आजवर सगळ्यात हिंसक गेले. जगाचा आढावा घेता, दिवसाआड एका कार्यकर्त्याची कोठे न कोठे हत्या झाली. २०१६ मध्ये एकूण १८५ तर या वर्षी सहा महिन्यातच शंभर. हे कार्यकर्ते स्थानिक जल, जंगल, जमीन यांच्यावरील अतिक्रमणाचा विरोध करत होते.

ग्लोबल विटनेस (Global Witness) नावाची एक ना-नफा संघटना अशा घटनांचा मागोवा १९९५ पासून जगभर घेत आहे. २००३ ला त्यांची शांततेच्या नोबेल पारितोषिकासाठी शिफारसही झाली होती. त्यांच्या कामातील काही प्रातिनिधिक उदाहरणे पाहू, त्यावरून प्रश्नाचे स्वरूप, भौगोलिक विस्तार, त्यामागचे हितसंबंध, गुंतलेल्या पैशाचे परिमाण व लागेबांधे स्पष्ट होतील.

यासाठी खाणी, तेल, आणि लाकूडतोड हे प्रमुख उद्योग पाहू.

**खनिजे**

यांच्या या खाणी बहुधा तिसऱ्या जगात असतात. खाण-उद्योगाकडून अपेक्षा अशी की स्थानिकांना त्यात नोकऱ्या मिळतील, त्यांचे दारिद्र्य व देशातील विषमता कमी होईल. तसे होताना दिसत नाही. सशस्त्र गुंड व भ्रष्ट सरकारी अधिकारी यांच्यात या खाणींवरच्या नियंत्रणाची स्पर्धा असते. त्यातून हिंसा व संघर्ष होतो. निर्माण होणारा पैसा सरकारच्या तिजोरीपर्यंत पोचत नाही. अप्रामाणिक उद्योग प्रचंड नफा मिळवतात. या नफ्यासाठी हिंसेकडे काणाडोळा करण्यात येतो.

ग्लोबल विटनेसने २०१३ पासून निरनिराळ्या देशांच्या सरकारांनी या खाणींच्या कामकाजावर सक्त नजर ठेवावी असा आग्रह धरला. मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये म्हणून संबंधित कंपन्यांचे कारभार पारदर्शी करण्याची निकड प्रतिपादित केली. त्याचा परिणाम म्हणून युरोपिअन युनियनने २०१६ला एक कायदा केला. त्यानुसार अशी खनिजे युरोपमध्ये आयात करणाऱ्या कंपन्यांनी त्या खाणीत शोषण किंवा हिंसा होत नाही याची ग्वाही देणे बंधनकारक झाले. या वर्षी काही कंपन्या यातून पळवाट काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

काँगो या आफ्रिकेतील देशांत सोन्याच्या खाणी आहेत. तेथे काम करणारे मजूर (त्यात बाल-मजूरही) जीव धोक्यात घालून १९ व्या शतकातल्या हात-आणि-घमेल्याने खनिज उकरतात. एका चिनी कंपनीने स्थानिक गुंडांना शस्त्रे व पैसा पुरवला. हे गुंड मजुरांकडून जीवाची भीती दाखवून पैसाही उकळत. आधी मजुरांचे वेतन कस्पटासमान, त्यात हा 'संरक्षणकर'. अशा एका खाणीतून पावणेदोन कोटी डॉलर्सचे सोने एका वर्षातच गायब झाले. ते स्मगलिंग होऊन आंतरराष्ट्रीय बाजारात आले असावे. अशा इतर व्यवहारांचा शोध घेता, त्यात सरकारी अधिकारी करोडो डॉलर्सची लाच घेत असल्याचे उघडकीला आले. चीनशिवाय इस्राएली, फ्रेंच उद्योगपती, एक अमेरिकन वित्त-संस्था, एक ब्रिटीश प्रतिष्ठित कंपनी हेही यांत गुंतले होते. खनिजावरचे अधिमूल्य काँगो सरकारला न जाता, ही ब्रिटीश कंपनी ते त्या इस्राएली उद्योगपतीला देत असे. अमेरिकी सरकारने यांसाठी वित्त-संस्थेला ४० कोटी डॉलरचा दंड केला.

असा कंपन्यांच्या पैशावरच्या स्थानिक सशस्त्र टोळ्या खाणींवर मालकी असावी म्हणून एकमेकांशीही सतत संघर्षात असतात.

अंदाजानुसार काँगो सरकारचा दीड अब्ज डॉलरचा महसूल या कंपन्यांनी खिशात टाकला.

अफगाणिस्तानमध्ये लपिस लाझुली (lapis lazuli) नावाचे खनिज मिळते. त्याच्या उत्पादनात सरकारी अधिकारी,तलेबान यांचा टक्का असतो. तीच गोष्ट मिआन्मारमधील जेड व इतर मूल्यवान खनिजांच्या व्यापाराची. लोकशाही सरकार येईपर्यंत त्यात वरिष्ठ लष्करी अधिकारी गुंतले होते. ते व सशत्र गानिमी टोळ्या संगनमताने ही लूट करत. आता सरकारने या व्यापारातील परवाने स्थगित केले आहेत.

**तेल आणि नैसर्गिक वायू**

वरीलप्रमाणेच या उत्पादनातील पैसा सरकारी भ्रष्टाचारात, परदेशी कंपन्यांकडे जातो. दोन्हींचा काळा पैसा परदेशी बँकांमध्ये बेनामी येतो, विकसित देशांत स्थावर मालमत्ता घेण्यात गुंतवणूक केली जाते, वगैरे. येथेही परवान्यांची फी, कर व अधिमूल्य यांतील अब्जावधी डॉलर सरकारी तिजोरीपर्यंत पोचत नाहीत. उदा. नायजेरियातील तेलाच्या खाणींमध्ये भ्रष्टाचारात एक अब्जाहून अधिक डॉलर अदृश्य झाले. त्या खाणी बीपी व इनी या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या ताब्यात होत्या. हे प्रकरण ग्लोबल विटनेसने

उघडकीला आणले. (हे एक प्रकरण बाहेर तरी आले, इतर अनेकांतील चोरीचे अंदाजही नाहीत.) मग बीपीच्या ऑफिसवर धाड घालण्यात आली आणि काही कोटी डॉलरचे खाते गोठवण्यात आले. इनीची चौकशी २०१४ पासून चालू आहे.

युरोपिअन युनिअनने २०१५पासून यासाठी कायदा केला. त्यानुसार कंपन्या किती पैसा त्या सरकारकडे जमा करतात ही माहिती प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. या कायद्याचा आढावा या वर्षी घेतला जाईल. ट्रम्प राजवटीमुळे त्याचे स्वरूप उद्योग-स्नेही होण्याची शक्यता आहे.

**जंगल**

जगभर लाकूड, रबर आणि खोबरेल तेलाची मागणी वाढत आहे. त्यामुळे वृक्षतोडही वाढत आहे. बहुतेक ठिकाणी जंगल कोणाच्या मालकीचे याची कागदोपत्री निश्चिती नसते व जंगलतोडीबाबतचे कायदे कागदावरच रहातात. मग आपल्याकडच्या वाळू माफियासारख्या टोळ्यांचे फावते.

पापुआ न्यू गिनी हा देश ऑस्ट्रेलिया व इंडोनेशियाच्या जवळ येतो. ७० लाख लोकसंख्येच्या या देशात ८०% जनतेला नागरी सुविधा नाहीत. बहुतेक आदिम जमाती. जगातील पर्जन्यक्षेत्राच्या जंगलांपैकी ७%जंगल तेथे आहे. तेच प्रमाण प्राणी-जगताचे.

मागील दशकात सरकारने लाकूडतोडीचे व नारळाच्या लागवडींचे परवाने स्वत:चेच नियम धाब्यावर बसवून दिले. यामुळे पारंपारिक जमिनींवर अतिक्रमण होत आहे. शेवटी हे लाकूड विविध मार्गे चीनला पोचते. चीनचा उल्लेख यासंदर्भात महत्त्वाचा आहे. चीनची सगळ्याच प्रकारच्या कच्च्या मालाची भूक वाढत आहे. उदा. आफ्रिकेतील पारंपारिक मच्छिमारी चीनच्या यांत्रिक नौकांनी धोक्यात आली आहे, वर म्हटल्याप्रमाणे अनेक देशातील खनिजे उपसण्याच्या नादात सामाजिक असंतोषात तेथे, विशेषत: आफ्रिकेत, भर पडत आहे. दरम्यान या एक जानेवारीपासून चीनने सगळ्या विदेशी स्वयंसेवी संघटनांना चिनी भागीदार घेणे व सरकार दरबारी नोंद करून घेणे बंधनकारक केले आहे. भारतातल्या सारखेच हे सब घोडे बारा टक्के धोरण दिसते. जनहितासाठी सरकारवरचा काही संघटनांचा अप्रत्यक्ष वचक कमी होऊ शकतो.

**वैध विरोधाचे निराळ्या स्तरावरील मार्ग**

अशा प्रकल्पांविरुद्ध स्थानिक उभे रहातात. इतरत्रचे कार्यकर्ते, मार्गदर्शक येतात. ही पर्यायी फळी असते. म्हणजे, पैसा विरुद्ध ही फळी या दोन्ही बाजू सर्वश्रुत आहेत.

पण एखादा प्रकल्प त्या ठिकाणी नको कारण तिथल्या स्थानिकांची रोजीरोटी जाईल यासाठी आंदोलन करणे हा पूर्वार्ध झाला. त्याबरोबर अशा आधीच्या प्रकल्पातील गैर पैसा काय मार्गाने शेवटी कोणत्या खात्यात कोणत्या नावाने कसा जमा झाला याचा कागदोपत्री पुरावा गोळा करणे, तो सरकार- दरबारी दाखल करणे, संबधितांना दोषी ठरवण्यासाठी न्यायालयात जाणे व तेथे खटला निर्णयापर्यंत चालवणे - हा उत्तरार्ध.

या शेवटच्या टोकापर्यंत गेल्यावर कायद्यातून कशा पळवाटा काढल्या जातात याचा शोध लागतो. कायदे व त्यांची अंमलबजावणी काय प्रकारे सुधारता येईल हे प्रस्ताव सरकारला पटवणे, त्यासाठी स्थानिक भाडोत्री गुंडांपासून बहुराष्ट्रीय कंपन्यांपर्यंत झुंज देणे, त्यांची बँकेची खाती गोठवण्यास संबधितांना भाग पाडणे इथपर्यंत आंदोलन जायला हवे. हा भाग निषेधाइतकाच महत्त्वाचा असतो. ही माहिती बाहेर आली तर नवीन प्रकल्पाच्या योजनेपासून खासगी गुंतवणूकदार, सरकार यांच्या कार्यपद्धतीत निश्चित फरक पडतो हे निदान युरोपमध्ये तरी दिसते. या माहितीने बृहत् जनमत - म्हणजे प्रकल्पाबाहेरचा समाज - जागृत होतो. करदात्याच्या पैशाचा अपव्यय होत आहे हे सिद्ध होणे आवश्यक असते. मग त्याची दखल प्रसारमाध्यमांना घ्यावी लागते. या येणाऱ्या दबावातून प्रसंगी सरकारी धोरण इष्ट दिशेने बदलते.

**पर्यावरणरक्षकांवरील वाढते हल्ले**

जगभर आज जल, जंगल, जमीन, प्रदूषण यावर २००० हून अधिक आंदोलने चालू आहेत. या कार्यकर्त्यांवर हल्ले होतात. हे हल्ले जास्त करून दुर्गम प्रदेशात होतात. ते बहुधा सरकारचे किंवा औद्योगिक कंपन्यांचे भाडोत्री गुंड करतात. हल्लेखोर क्वचितच पकडले जातात. ठार मारला गेलेला कार्यकर्ता एक असला तरी उर्वरित समूहाला खुनाच्या, विस्थापनाच्या, वस्ती उद्ध्वस्त करण्याच्या धमक्या दिल्या जातात. हे हल्ले बहुधा आदिम जमातींवर होतात. कोलंबिया, होन्डुरास, मेक्सिको वगैरे द. अमेरिकेत हे प्रसंग वाढत आहेत. मे महिन्यात जमिनीच्या वादांमध्ये ब्राझीलमध्ये शेतकऱ्यांनी अशा वस्तीतील लोकांचे हात तोडले. होन्डुरास देश तर पर्यावरणवादी कार्यकर्त्यांसाठी जगात सगळ्यात धोकादायक आहे. मागील वर्षी तेथे बर्टा कॅसेरस या कार्यकर्तीची हत्या झाली. यावर्षी मेक्सिकोमध्ये जंगलतोडीविरुद्ध निषेध करणाऱ्या इझिद्रो बाल्देनेग्रो याची हत्या झाली, ही फक्त द. अमेरिकेतील उदाहरणे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या या खात्याच्या विशेष अधिकाऱ्याच्या शब्दांत : आधीच समाजाच्या परिघावर असणारे, ज्यांना शासकीय व न्यायाच्या व्यवस्थांमध्ये प्रवेश नाही, ज्यांचे जगणे पर्यावरणावर अवलंबून आहे; अशांनाच आर्थिक फायद्यासाठी बळी केले जात आहे. त्यातही काळजीची बाब म्हणजे, हे हल्ले कोणीही उठून करावेत, गुन्ह्याला शिक्षा नाही, असे वातावरण निर्माण होत आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*